# चक्रपाणी

२०२५



मुख्य कवायत मैदान क्रं. १



मैदान क्रं. २



मुख्य कार्यालय

**✻ ड्रोणच्या साहाय्याने टिपलेले नानवीज पोलीस कॅम्पचे छायाचित्र ✻**









# चक्रपाणी २०२५

| | | |
|---|---|---|
| **मुख्य संपादक व प्रकाशक** | : | मा.श्री.नंदकुमार ठाकुर<br>भा.पो.से.प्राचार्य तथा पोलीस अधिक्षकपोलीस प्रशिक्षण केंद्र,<br>नानवीज,दौंड |



| | | |
|---|---|---|
| **कार्यकारी संपादक** | : | मा.श्री. रघुनाथ शिंदे<br>उप-प्राचार्य,पोलीस प्रशिक्षण केंद्र,<br>नानवीज,दौंड |



| | | |
|---|---|---|
| **विशेष सहाय्य** | : | श्री.शैलेंद्र भुरण<br>पोलीस निरीक्षक, पोलीस प्रशिक्षण केंद्र,<br>नानवीज,दौंड |



: पो.हवा.श्री.प्रशांत काळे,
: पो.हवा.श्री.मंगेश चव्हाण
: पो.हवा.श्री.निलेश थोरात





| | | |
|---|---|---|
| **फोटोग्राफी** | : | श्री.दिपक वराळे -(दिपक डिजीटल फोटोज्, नानवीज, दौंड)<br>मो.९०११६२३००४ deepak_varale_83 |
| **अंतर्गत सजावट, मुद्रक** | : | श्री.सुधिर टकले (साई फ्लेक्स,काष्टी 9028 910 930) |

---

या स्मरणिकेतील लेखांशी किंवा विचारांशी संपादक अथवा पोलीस प्रशिक्षण केंद्र सहमत असेलच असे नाही.

आपण महाराष्ट्र पोलीस दलामध्ये चालक या पदावर जरी भरती झाला आहात तरी आपणास पोलीस अंमलदार या पदावर भरती होणारे अंमलदार यांचप्रमाणे मुलभूत आंतरवर्ग व बाह्यवर्ग प्रशिक्षण या सत्रामध्ये देण्यात आले आहे. आपण सर्व हे मुलभूत व वाहन चालक प्रशिक्षण पूर्ण करुन कायद्याची अंमलबजावणी व राज्यघटनेने नागरीकांना दिलेल्या मुलभूत हक्काचे रक्षण करणाऱ्या पोलीस दल या यंत्रणेचा एक भाग झाला आहात याबद्दल आम्ही आपणा सर्वांचे हार्दिक अभिनंदन करतो.

आपण सर्व चालक पोलीस अंमलदार आपल्या पदाप्रती एकनिष्ठ राहुन या पदाचे कर्तव्य आदर्शवत पार पाडाल त्याचबरोबर महाराष्ट्र पोलीस दलाचे "सद् रक्षणाय खल निग्रहणाय" या ब्रिदवाक्याप्रमाणे सज्जनांचे रक्षण व दुर्जनांचे दमन करण्याची जबाबदारी स्वीकारुन यापुढे आपण कठीण प्रसंगी नेहमी सत्याच्या बाजुने ठामपणे उभे राहुन निःपक्षपातीपणे कर्तव्य करा. राष्ट्रविरोधी शक्तींना आळा घालून राष्ट्राची एकता व अखंडीतता ठेवण्यासाठी आपण सदैव तयार असायला पाहिजे.

सध्याच्या युगामध्ये आपण कोणत्याही क्षेत्रात कमी पडू नये या दृष्टीकोनातून मुलभूत प्रशिक्षणामध्ये आधुनिक पध्दतीचा अवलंब करुन ई-लायबरीच्या माध्यमातून ई-बुक प्रणाली, ई-लर्निंग, संगणक प्रशिक्षण, सीसीटीएनएस, सायबर क्राईम याबरोबरच आपणा सर्वाचा संवेदनशिल व मृदु कौशल्य विकास होण्यासाठी भावनिक प्रज्ञावंत तसेच वाचन लेखन कौशल्य या अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात आला. जनतेचा पोलीस खात्यावर अपार विश्वास असल्यामुळे ते त्यांच्या कोणत्याही संकटात पोलीसांना मदतीसाठी अवाहन करतात. आपण त्यांच्या तक्रारी संयमाने आदराने व सामंजसपणे ऐकूण घेऊन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशिल राहणे आवश्यक आहे. "चक्रपाणी" या पुस्तिकेकरिता पोलीस प्रशिक्षण केंद्रातील चालक पोलीस प्रशिणार्थी, पोलीस अधिकारी विधीनिर्देशक व पोलीस अंमलदार यांनी स्वेच्छेने उपयुक्त मार्मिक लेख, कविता तयार केल्या त्याबद्दल मी सर्वांचे अभिनंदन करतो.

महाराष्ट्र पोलीस दलाची प्रतिमा आपण करत असलेल्या कठोर परिश्रमावर व कर्तव्याशी एकनिष्ठ राहील्यामुळे उंचावणार आहे. आपण असेच कर्तव्यनिष्ठ राहून या दलास यशाच्या शिखरावर कायम रहाल अशी सदिच्छा व्यक्त करतो. सरते शेवटी आपणास उज्वल भविष्याच्या शुभेच्छा देतो तसेच आपले कर्तव्य आपण परिश्रमपुर्वक पार पाडाल अशी अपेक्षा व्यक्त करतो.




**मा.श्री. कृष्ण प्रकाश** भा.पो.से
**अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण**
**व खास पथके महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**मा.श्री. कृष्ण प्रकाश** भा.पो.से
**अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण**
**व खास पथके महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

# मा. विशेष पोलीस महानिरीक्षक प्रशिक्षण व खास पथके यांचे मनोगत...

प्रथमत: "चक्रपाणी" या पुस्तिकेकरिता प्रशिक्षणार्थी पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी स्वच्छेने उपयुक्त मार्मिक लेख, कविता तयार केल्या त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो.पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज दौंड येथे सन २०११ पासून पोलीस प्रशिक्षणार्थी यांनी घेतलेल्या प्रशिक्षणास उजाळा देण्याकरीता स्मरणिका तयार केली जाते. आजपर्यंत २३२१५ नवप्रविष्ठ पोलीस प्रशिक्षणार्थी यांनी राज्याच्या विविध घटकातून पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज दौंड येथे येऊन मुलभूत प्रशिक्षण घेतले असून ते महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रामध्ये आपली कामगिरी उत्तमपणे बजावत आहेत. आपणही पोलीस दलामध्ये चालक या पदावर भरती झाला असला तरी, आपणास देण्यात आले मुलभूत आंतरवर्ग व बाह्यवर्ग प्रशिक्षण हे इतर अमंलदार यांच्या प्रमाणेच देण्यात आलेले आहे.हे खडतर प्रशिक्षण पूर्ण करुन, कायदयाची अमंलबजावणी व राज्यघटनेने नागरिकांना प्रदान केलेल्या मूलभूत हक्काचे रक्षण करणाऱ्या पोलिस दल या यंत्रणेचा एक भाग झाला आहात याबद्दल मी आपले सर्वांचे हार्दिक आभिनंदन करतो.

सध्याच्या संगणक युगामध्ये आपण मागे राहू नये, या दृष्टीकोनातून मुलभूत प्रशिक्षणात आधुनिक पद्धतीचा अवलंब करून ई-बुक, ई-लर्निंग, संगणक प्रशिक्षण, सीसीटीएनएस, सायबर क्राईम, पोलिस ई-लायब्ररी, व्हर्चुअल क्लासरुम या बरोबरच जनतेच्या समस्या संवेदनाशिलतेने सोडवण्यासाठी मृदु कौशल्य विकास, भावनिक प्रज्ञावंत यासारख्या विविध अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात आला आहे. आपण प्राप्त केलेल्या या अमुल्य शिक्षणाचा समाजास योग्य न्याय देण्याकरिता उपयोग कराल, अशी मला खात्री आहे.

महाराष्ट्र पोलिसांची प्रतिमा आपण आपल्या कठोर परिश्रमाने व कर्तव्याशी एकनिष्ठ राहून यशाच्या शिखरावर कायम राखाल अशी मी अपेक्षा करतो आणि आपल्यामधून उद्याचे आदर्श व कर्तव्यनिष्ठ पोलीस घडावेत ही सदिच्छा व्यक्त करतो.



**मा.श्री.प्रविण पडवळ भा.पो.से**
विशेष पोलीस महानिरीक्षक प्रशिक्षण
व खास पथके
महाराष्ट्र राज्य, मुंबई

# मा.प्राचार्य यांची प्रस्तावना



**मा.श्री.नंदकुमार ठाकूर, भा.पो.से.**
प्राचार्य तथा पोलीस अधीक्षक,
पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज-दौंड

पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज-दौंडची निर्मिती सन १९९० मध्ये झाली असून प्रत्यक्षात प्रशिक्षण केंद्राचे कामकाज दिनांक १ मे १९९० पासून सुरु आले आहे. या प्रशिक्षण केंद्राची एकूण प्रशिक्षणार्थी क्षमता ६४० इतकी आहे. या प्रशिक्षण केंद्रातून अद्यापर्यंत एकूण २३२१५ नवप्रविष्ट पोलीस अंमलदार यांना प्रशिक्षित करण्यात आलेले आहे .

महाराष्ट्र पोलीस दलामध्ये चालक पोलीस अंमलदार या पदाकरीता स्वतंत्र भरती प्रक्रिया प्रथमच राबवण्यात आली सदर भरती प्रक्रियेमधून पोलीस दलात नव्याने सामील झालेल्या चालक पोलिस अमंलदार करीता या प्रशिक्षण केंद्रात प्रथमच प्रशिक्षण देण्याचा उपक्रम राबवण्यात आला, त्या अनुषंगाने प्रशिक्षण संचलनालयाने नव्याने मुलभूत प्रशिक्षणाचा आराखडा व अभ्यासक्रम नव्याने आखण्यात आला. सदर आराखड्यानुसार मुलभूत प्रशिक्षणाचा (आंतरवर्ग व बाह्यवर्ग) कालावधी हा सहा महिन्याचा ठरवुन प्रशिक्षण कार्यक्रमात व अभ्यासक्रमात अंशतः बदल करण्यात आले. आतरवर्ग अभ्यास क्रमामध्ये प्रामुख्याने १)भारताचा मोटार वाहन कायदा १९८८ व २)महाराष्ट्राचा मोटर वाहन कायदा १९८९ हे विषय नव्याने समाविष्ट करण्यात आले.

प्रात्यक्षिक प्रशिक्षणातंर्गत मोटर परीवहन विभागा कडून देण्यात येणारे ४५दिवसाचे तांत्रिक प्रशिक्षण व चालकाने वाहन हाताळताना व आपले कर्तव्य बजावताना कोणत्या गोष्टी कराव्यात व कोणत्या गोष्टी करू नयेत. (DO'S AND DON'TS) यांचे प्रशिक्षण याच प्रशिक्षण केंद्रात देण्याचे ठरविण्यात आले. प्रशिक्षण संचलनालयाने वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयानुसार अभ्यासक्रमातील बदलाच्या अनुषंगाने अंतरवर्ग अभ्यासक्रमाच्या नव्याने पी.पी.टी. तयार करुन त्याच बरोबर तांत्रीक प्रशिक्षणाकरीता आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांची (रॅम्प, मोटार वाहन पत्राशेड इत्यादी) नव्याने उभारणी करण्यात आली.

सत्र क्रमांक ४७ मध्ये प्रशिक्षणाकरिता विविध पोलीस घटकांमधून एकूण ५०० नवप्रविष्ट चालक पोलीस अंमलदार यांनी प्रशिक्षण घेतले आहे. त्यांना सशक्त पोलीस दलाचा सक्षम संवेदनशील परंतु कायदा व सुव्यवस्था आणि निर्णयाक्षम खंबीरपोलीस जवान तयार करणे करिता विविध कायद्याचे ज्ञान,शारिरीक प्रशिक्षण, योगासने, प्राणायाम, ताण- तणाव व्यवस्थापन, माहिती अधिकार, मानव अधिकार तसेच जेष्ठ नागरिक,महिला व बालके यांचे विषयीच्या कायद्यातील तरतूदी बाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

पोलीस प्रशिक्षण केंद्रात पोलिस जवानांना प्रशिक्षित करण्याकरीता मॉडेल पोलिस स्टेशन, ट्रॉफिक पार्क, आयडी पार्क, क्राईम सीन व न्यायवैद्यक प्रयोगशाळा या आधुनिक सुविधाचा वापर करण्यात आला आहे, त्याच बरोबर व्हर्चुअल क्लासरुम, ई-ॲकॅडमी, ॲम्बीस सिस्टिम, सी.सी.टी.एन.एस. यासारख्या तांत्रिक विषय आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन शिकवण्यात आले. आधुनिक युगात घडणाऱ्या संगणकीय गुन्हयाची व्याप्ती लक्षात घेऊन सायबर क्राईम, आर्थिक गुन्हे विषयक तज्ञांकडुन मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले,त्याचबरोबर प्रशिक्षणार्थीनां स्वयंचलीत शस्त्राची हाताळणी, गोळीबार सराव, शस्त्रकवायत, जमाव विसर्जन इत्यादीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

प्रशिक्षणार्थी यांच्या ज्ञानात भर पडावी त्याच बरोबर त्यांना त्यांच्या वैयक्तीक जीवनात योग्य मार्गदर्शन मिळावे, वैचारीक दृष्टीकोन बदलावा याकरीता शिवचरीत्र, ताण-तणाव व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, वेळेचे महत्व व व्यवस्थापन यासारख्या महत्वाच्या विषयासंदर्भातील तज्ञाकडून मार्गदर्शन देण्यात आले. प्रशिक्षण कालावधी दरम्यान घेण्यात आलेल्या अंतर क्रिडा स्पर्धेमध्ये विविध क्रिडाप्रकार घेण्यात आले त्यामध्ये या सत्र क्रमांक

४७ मधील प्रशिक्षणार्थी यांनी भाग घेऊन पदक प्राप्त केली या सर्वांचे हार्दीक अभिनंदन करतो व त्यांना पूडील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. .

प्रशिक्षणा व्यतिरीक्त प्रशिक्षणार्थी यांचे अंगी असणारे कौशल्य गुणांचा विकास व्हावा. त्याच बरोबर त्यांचे इतर छंद जोपासले जावे व त्यातुन नवनिर्मिती घडावी. या बाबींचा विचार करुन अविष्कार क्लब, फोटोग्राफी क्लब, मनोरंजन क्लब यासारखे विविध उपक्रम राबवण्यात आले. रक्तदानाचे महत्व पाहता प्रशिक्षण केंद्रामध्ये शहिद दिनाचे औचित्य साधुन रक्तदान शिबीर आयोजीत करण्यात आले. सदर शिबीरात पोलिस अधिकारी, अंमलदार व प्रशिक्षणार्क्षी यांनी उत्स्फुर्तपणे मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून ३१५ युनिट रक्त हे उपजिल्हा रुग्णालय दौंड पुणे यांना देण्यात आले.प्रशिक्षण केंद्रामध्ये वृक्ष लागवड, सुशोभिकरण केल्यामूळे, नियमित स्वच्छता ठेवल्यामुळे परिसर अतिशय निसर्गरम्य व देखणा दिसत आहे आपल्या प्रशिक्षण केंद्रामध्ये सेंद्रीय खत प्रकल्प, वृक्ष लागवड करण्याकरीता रोपांची नर्सरी, तसेच जलसंधारण्याचे महत्व व पाण्याची आवश्यकता विचारात घेऊन पूर्वी अस्तित्वात असलेल्या शेततळ्याचे खोलीकरण व पुनर्जीवन यासारखे विविध पर्यावरणपूरक कार्यक्रम हाती घेतलेले आहेत. निसर्ग संवर्धनाचे महत्व लक्षात घेऊन या वर्षी विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करुन त्यांचे संवर्धन केले जात आहे. प्रशिक्षण केंद्रातील प्रत्येक प्रशिक्षणार्थीस एका झाडाचे संगोपन व देखभाल करणेकरीता दत्तक देण्यात आले होते. या सर्व कामात प्रशिक्षणाथी याचे मोलाचे योगदान आहे. .

'चक्रपाणी' पुस्तिकेकरिता प्रशिक्षणार्थी पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी स्वच्छेने उपयुक्त मार्मिक लेख, कविता तयार केल्या त्याबद्दल त्याचे अभिनंदन. पुस्तिका तयार करण्याकरिता पोलीस निरीक्षक/शैलेद्र भुरण व पोलीस हवालदार/निलेश थोरात यांनी त्यांचे दैनंदिन कामकाज साभाळून पुस्तिका तयार करणेसाठी माहिती संकलित करुन व्यवस्थित क्रमबध्द पध्दतीने मांडणी केली आहे.तसेच पो.हवा. पी एस काळे,पोहचा/मंगेश चव्हाण व पोहबा./रविंद्र मेरगळ यानी तांत्रीक स्वरुपाची मदत केली, दिपक वराळे यांनी उत्तम प्रकारे छायाचित्रण केले. तसेच प्रशिक्षणाथी रोल नं.९९ निलेश कांबळे व रोल नं.५०१/नितीन चव्हाण यांनी टंकलेखनाचे

४७ मधील प्रशिक्षणार्थी यांनी भाग घेऊन पदक प्राप्त केली या सर्वांचे हार्दीक अभिनंदन करतो व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. कामकाज पार पाडले. त्यांच्या या उत्कृष्ट कामाबद्दल सर्वांचे अभिनंदन, वरील अधिकारी व अंमलदार यांच्याकडून भविष्यात देखील असेच पोलीस दलाकरिता योगदान राहील अशी अपेक्षा बाळगतो व त्यासाठी त्यांना शुभेच्छा देतो. .

सरते शेवटी आपण या प्रशिक्षण केंद्रात मागील सहा महिन्याच्या कालावधीत घेतलेल्या खडतर प्रशिक्षण व ज्ञान यांचा उपयोग नागरीकाच्या हक्काचे व अधिकाराचे रक्षण करण्याकरिता व समाजात सुरक्षिततेची भावना निर्माण व जनतेला न्याय मिळवून देण्यास कराल अशी अपेक्षा बाळगतों व हे करण्याची शक्ती ईश्वर आपणास देवो ही प्रार्थना करतो सत्र क्र.४७ मध्ये मुलभूत व तांत्रिक वाहन चालक प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या सर्व नवप्रविष्ठ चालक पोलीस शिपाई यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी हार्दीक हार्दीक शुभेच्छा......!

**मा.श्री.नंदकुमार ठाकूर, भा.पो.से.**
**प्राचार्य तथा पोलीस अधीक्षक**
**पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज-दौंड**

# मा.उप-प्राचार्य यांची प्रस्तावना

पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज–दौंड हे महाराष्ट्रतील १० प्रशिक्षण केंद्रापैकी एक प्रशिक्षण केंद्र आहे. प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण देणारे अंतरवर्ग अधिकारी, बाहयवर्ग अधिकारी व अंमलदार यांना अतिशय प्रतिकुल परिस्थितीमध्ये राहुन कर्तव्य करावे लागते. सदर प्रशिक्षण केंद्र हे दौंड शहरापासून १० किमी. अंतरावर वसलेले आहे. रस्त्यांची दुरावस्था, पाणी व वीज तसेच अधिकारी व अंमलदार यांना पुरेसे निवासस्थाने उपलब्ध नाहीत, अशा परिस्थितीतही मा.प्राचार्य श्री.नंदकुमार ठाकूर, भा.पो.से. यांचे मार्गदर्शनाखाली सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार उत्कृष्ट कामकाज करीत आहेत.

मा. नंदकुमार ठाकूर, भा.पो.से.सर यांनी पोलीस प्रशिक्षण केंद्र नानवीज दौंड येथे प्राचार्य पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर पोलीस प्रशिक्षण केंद्रातील प्राचार्य कार्यालया समोर सुशोभिकरण, राजगड वसतिगृह, रायगड वसतिगृह, ज्ञानमंदिर व भिमागुरुकुल याठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसवुन प्रशिक्षण केंद्राचे आधुनिकीकरण करण्यात आले. तसेच या प्रशिक्षण केंद्रामध्ये नव्याने बहुउद्देशीय हॉल व अवजड वाहन दुरुस्तीसाठी नव्याने दोन रॅम्पची निर्मिती करण्यात आली आहे. कामकाजाचा सतत पाठपुरावा करुन आढळून आलेल्या त्रुटीच्या पुर्वतेसह कामकाजपुर्णत्वास नेले. सत्र क्र.४७ च्या प्रारंभास १८ घटकामधून आलेल्या ५०० प्रशिक्षणार्क्षी पोलीसांपैकी जे विविध कारणांनी बाह्यवर्ग प्रशिक्षणात कमकुवत आहेत हे मा. प्राचार्य यांच्या निदर्शनास आल्याबरोबर, परेडवर स्वतः हजर राहून प्रशिक्षणार्थी यांना मार्गदर्शन करुन त्यांचे मनोबल व धैर्य वाढवले, त्याचेत प्रशिक्षणाची आवड निर्माण केली. बहुतांश प्रशिक्षणार्थी हे ग्रामीण भागातील असल्याने त्यांना अष्टपैलू पोलीस घडविण्यासाठी विविध उपक्रमांसोबत विविध क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शकांची व्याख्याने आयोजित केली त्याच बरोबर सदरचे प्रशिक्षणार्थी हे प्रामुख्याने चालक या पदावर पोलीस दलात भरती झाले असल्याने यांना मा.प्राचार्य यांचे संकल्पनेतुन खुल्यामैदानावर प्रत्यक्ष अपघातजन्य परीस्थिती व घ्यावयाची काळजी या संदर्भातील प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक महिन्यात शिकवण्यात आलेल्या अभ्यास क्रमावर व देण्यात आलेल्या प्रशिक्षणावर आधारित प्रशिक्षणार्थीची अंतरवर्ग व बाह्यवर्ग विषयाच्या सराव परीक्षा घेतल्या. दररोज सायंकाळी अंतरवर्गात शिकविण्यात आलेल्या अभ्यासाची हजेरी नंतर उजळणी, प्रत्येक मिटींगमध्ये अंतरवर्ग अधिकारी व बाह्यवर्ग अधिकारी याचेकडुन प्रशिक्षणार्थीच्या प्रगतीबाबत आढावा घेऊन त्यांना अधिकाधिक दर्जेदार प्रशिक्षणासाठी मार्गदर्शन करुन प्रोत्साहीत केल्याने प्रशिक्षणार्थीमध्ये एक सक्षम पोलीस म्हणून आत्मविश्वास निर्माण झाला.

प्रशिक्षण केंद्र नानवीज येथे प्रशिक्षणार्थी यांना नियमित अभ्यासक्रमाबरोबर एक्सपोजर व्हिजीट, विविध विषयांवरील व्याख्याने, संगणकाचे ज्ञान, आर्थिक बचत, वेळेनुसार कामकाजाचे नियोजन इत्यादींचे ज्ञान दिले आहे. प्रशिक्षणार्थीना पोलीस स्टेशनचे प्रत्यक्ष कामकाजाची माहिती मिळावी म्हणून अद्ययावत मॉडेल पोलीस स्टेशन व दहशदवादी कारवाई दरम्यान वापरण्यात येणाऱ्या स्फोटकाबाबतचे प्रात्यक्षिक व माहिती मिळावी याकरिता आय.ई.डी. पार्कची निर्मिती करण्यात आलेली आहे. प्रशिक्षणाव्यतिरीक्त प्रशिक्षणार्क्षी याचे अंगी असणारे कौशल्य गुणाचा विकास व्हावा, त्याच बरोवर त्याचे इतर छंद जोपासले जावे व त्यातुन नवनिर्मिती घडावी या बाबीचा विचार करुन अविष्कार क्लब, फोटोग्राफी क्लब, मनोरंजन क्लब यासारखे विविध उपक्रम राबवण्यात आले.

प्रशिक्षणार्थी यांचे आरोग्य उत्तम राहवे याकरिता मा. प्राचार्य यानी भोजनालयातील व्यवस्था, परिपूर्ण आहाराबाबत स्वतःलक्ष देऊन वेळोवेळी मार्गदर्शन केल्याने प्रशिक्षणार्थीना अत्यंत वाजवी दरामध्ये सकस व परिपूर्ण आहार देण्याची जबाबदारी आम्ही यशस्वीपणे पूर्ण करु शकलो. यासोबत प्रशिक्षणाथीचे नियमितपणे संमेलन घेऊन त्यांचेशी सुसंवाद साधल्याने वेळेवर त्यांच्या अडीअडचणी सोडविल्या आहेत.

प्रशिक्षाणार्थी पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी स्वच्छेने उपयुक्तः मार्मीक लेख, कविता तयार केल्याबददल त्यांचे अभिनंदन तसेच पुस्तिका तयार करण्याकरिता पोलीस निरीक्षक/शैलेंद्र भुरण व पो.हवालदार/निलेश थोरात यांनी त्यांचे दैनदिन कामकाज सांभाळून पुस्तिका तयार करणेसाठी माहिती संकलित करुन व्यवस्थित क्रमबध्द पध्दतीने मांडणी



## रघुनाथ शिंदे

उप-प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र
नानविज,दौंड

केली आहे. तसेच पो.हया./पी एस काळे,पोहवा/मंगेश चव्हाण व पोहवा/रविंद्र मेरगळ यांनी तांत्रीक स्वरुपाची मदत केली. दिपक वराळे यांनी उत्तम प्रकारे छायाचित्रण केले. तसेच प्रशिक्षणार्थी रोल नं.९९ निलेश कांबळे व रोल नं.५०१/ नितीन चव्हाण यांनी टंकलेखनाचे कामकाज पार पाडले. त्यांच्या या उत्कृष्ट कामाबद्दल सर्वांचे पुन्हा एकदा अभिनंदन सत्र क्र.४७ मधील पोलीस प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या सर्व नवप्रविष्ठ चालक पोलीस अंमलदार यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी हार्दीक शुभेच्छा......!

**मा. श्री. रघुनाथ शिंदे**
उप-प्राचार्य,
पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज,दौंड.

# मा. वैद्यकिय अधिकारी यांची प्रस्तावना



**डॉ. नितीन मारुती खामकर**
वैद्यकिय अधिकारी गट अ
पोलिस प्रशिक्षण केंद्र नानवीज, दौंड. मो.9404695299

## * मला निरोगी राहायचंय *

जागतिक आरोग्य संघटनेने 'स्वास्थ्य/निरोगी' म्हणजे फक्त रोगांचा किंवा अयोग्यतेचा अभाव नाही, तर शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक भल्याची एक संपूर्ण स्थिती आहे. म्हणजेच स्वास्थ्य केवळ शारीरिक निरोगीपणाच्या पलीकडे आहे. मानसिक आरोग्य, सामाजिक आणि आध्यात्मिक संबंध हे देखील व्यक्तीच्या स्वास्थ्याचा अविभाज्य भाग आहेत.

'प्रसन्न आत्मेंद्रिय मनः स्वस्थः इत्यभिधीयते।' आयुर्वेदशास्त्रानुसार शारीरिक स्वास्थ्याबरोबर आत्मा, इंद्रिय मन यांची (आंतरीक स्वास्थ्य) स्वास्थ्याकरीता प्रसन्नता असणे महत्वाचे आहे.

स्वास्थ्य प्राप्तीसाठी आहार- विहार, निद्रा, मानसिक स्वास्थ्य यांना विशेष महत्व आहे. सध्याच्या काळात बदललेली जीवनशैली, अनिष्ट आहार पद्धती, ताण-तणाव, व्यसनाधिनता, व्यायाम/ शारीरिक कष्टाचा अभाव तसेच अवेळी निद्रा यामुळे अनेक रोगांचे प्रमाण वाढलेले पहावयास मिळते. यात विशेषतः असंसर्गजन्य आजार मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग, कर्करोग यांचे वाढते प्रमाण दिसून येते.

आधुनिक वैदयक शास्त्र तसेच आयुर्वेद शास्त्रानुसार योग्य संतुलीत विधियुक्त आहारसेवन खूप महत्वाचे आहे.

देहो ही आहार संभवः ।
अन्नं वृत्तीकराणाम् श्रेष्ठम् ।

आपल्या देहासाठी आहार महत्वाचा असून, दीर्घायुष्यासाठी आहार/अन्न हेच श्रेष्ठ सांगीतले आहे.

अन्न श्रेष्ठता -

न हि आहारसमं किंचीत औषधं समुपलभ्यते ।
इष्टवर्णगंधरसस्पर्श विधीविहित अन्नपानं प्राणीनां प्राणमाचक्षते ।

आयुर्वेद शास्त्रानुसार आपल्या आहारात सर्व रसांचा (Taste's) म्हणजेच (गोड, आंबट, खारट, तिखट, कडू आणि तुरट)समावेश असावा खाण्याचा क्रमदेखील पचण्यास जड, मधुररसाचे पदार्थ (sweet dish) सुरुवातीला असावेत. त्यामानाने चटणी, लोणचे, खारे पदार्थ अल्प प्रमाणात अथवा चवी पुरतेच असावेत. सध्या starter च्या नावाने तिखट, आंबट, खारट पदार्थ सुरुवातीलाच जास्त खाण्यात येतात ते चुकिचे आहे.Fast food,Junk food, डबाबंद अन्नपदार्थ,शीतपेये आरोग्यासाठी घातक आहेत. अन्यथा Fast food - Fast Death असा परिणाम ठरलेलाच. तसेच विनाकारण वारंवार पित शामक वेदनाशामक, प्रतिजैविके इ. प्रकारची औषधी सेवन करु नयेत त्यायोगे शरीरात अनेक व्याधी उत्पादक बदल होऊ शकतात.आहार जर निरोगी राहण्यासाठी महत्त्वाचा आहे तर त्याचे नियोजन देखील योग्यच असले पाहिजे.

आयुर्वेद शास्त्रानुसार आहारविधी पुढीलप्रमाणे अपेक्षित आहे-

१) उष्णं अश्नीयात्-आहार नेहमी ताजा व गरम सेवन करावा. आहारीय पदार्थ दुसऱ्यांदा गरम करुन खाऊ नयेत. शिळे अन्नपदार्थ तसेच शिळे झालेले गरम पाणी देखील सेवन करू नये.थंड पदार्थ, फ्रिज मधील पदार्थ टाळावेत. अग्निसंस्काराने शिजवलेली द्रव्य उत्तरोत्तर पचावयास हलकी होतात. परंतु यामध्ये थंड पदार्थ/कच्च्या स्वरूपातील आहारीय पदार्थ यांवर अग्निसंस्कार/प्रक्रिया नाही झाल्याने या सगळ्या गोष्टी पचायला जड असु शकतात. आपला पाचक अग्नी त्यावर योग्य प्रकारे पाचनक्रिया करू शकत नाही.त्यामुळे त्या अपक्व स्वरूपातच शरीराबाहेर टाकल्या जातात, म्हणून मलाचे प्रमाण वाढते आणि पोट साफ झाल्यासारखे वाटते. वारंवार असे थंड अन्नघटक सेवन झाल्यास पचनाच्या तक्रारी, गॅसेस, पोट फुगल्यासारखे वाटणे, भूक न लागणे, अशक्तपणा येणे यासारख्या तक्रारी वाढायला सुरुवात होते. काही कालावधीनंतर याचा परिणाम यकृतावरती देखील होतो.

२) स्निग्धं अश्नीयात्-आहार मर्यादित स्निग्ध असावा. त्यायोगे पचन कार्य चांगले होते.

३) मात्रावत अश्नीयात्-आहाराचा प्रकार, आपली स्वास्थ्य स्थिती, आहार पचवण्याची क्षमता याचा विचार करून योग्य मात्रेत आहार घ्यावा, तो अतिकमी अथवा तडस लागेपर्यंत घेवू नये. अन्यथा त्यामुळे पचनव्यवस्था बिघडते.

मात्रा ही अग्नेः प्रवर्तकाः ।

मात्रायुक्त (प्रमाणात घेतलेला) आहार पचनक्षमता उत्तम ठेवतो. आहारमात्रा पाचनक्षमतेवर (जाठराग्नीबलावर) अवलंबुन असते. जी आहारमात्रा सकाळी सेवन केल्यावर सायंकाळपर्यंत वा सायंकाळी सेवन केल्यानंतर सकाळ पर्यंत पचन/जीर्ण होते तो प्रमाणयुक्त आहार. पचन होत असताना कोणतीही अस्वस्थता जाणवत नाही. मलमूत्र, वात विसर्जनास त्रास होत नाही. सुखायु (उत्साह, बल, प्रसन्नता) वाढविते. अशी मात्रा योग्य मात्रा आहे. प्रत्येक व्यक्तीची पचनक्षमता वेगळी असते, त्यान्वये प्रत्येकाची आहारमात्रा वेगळी असते.

४) जीर्णे अश्नीयात्-अगोदर घेतलेला आहार पूर्ण जीर्ण /पाचन झाल्याची खात्री झाल्यावरच जेवावे. अजीर्ण /अपचन असताना तसेच भूक नसताना जेऊ नये. अजीर्णाशन हे अमुक एका रोगाचे कारण नाही ते सर्व रोगांचे कारण ठरू शकते म्हणून ते टाळावे. अनेक वेळा घड्याळात पाहून जेवले.
जाते किंवा पुन्हा वेळ मिळत नाही म्हणून जेवले जाते.पुन्हा जेवणाचे (खाण्याचे योग्य) पदार्थ मिळतील किंवा नाही या भीतीने आधीच घराबाहेर निघण्यापूर्वी अधिकचे खाऊन घेतले जाते.परिस्थितीने बाध्य केल्यामुळे या चुका होतात. असे अनिवार्य कारणासाठी खावयाचे झाल्यास लघु आणि कमी मात्रेत खावे. पुढचे भोजन मात्र अजीर्ण असताना भोजन करू नये.

५) वीर्य अविरुद्धम् अश्नीयात्-आहार वीर्य अविरुद्ध असावा. शरीर घटकांचे स्वास्थ्य बिघडवणाऱ्या घटकांना विरुद्ध म्हणतात. उदा. दूध आणि मासे एकत्र खाऊ नयेत. दिवसा झोपणे देखील शरीर अग्निरोधक आहे. त्यामुळे आपण दिवसा झोपू नये. उष्ण, शीत, रुक्ष, स्निग्ध, लघु, गुरु अशा विरुद्ध गुणधर्माची आणि विरुद्ध रसाची द्रव्ये एकत्र करून सेवन करणे याला आयुर्वेदात विरुद्ध आहार असे म्हणतात. अशा पदार्थांच्या नित्य सेवनाने शरीरात विषासारखी घातक द्रव्य तयार होतात. परिणामी त्वचा रोग, ऑटोइम्युन डिसऑर्डर्स सारखे कष्टसाध्य किंवा असाध्य विकार होऊ शकतात. म्हणून मांसाहारी पदार्थ दूध, फळे, भाज्या, लिंबू, पनीर, मध, नारळाचे दूध इत्यादी पदार्थ तसेच मिक्स व्हेज प्रकारच्या डिशेस एकत्र करून सेवन करू नयेत.

६) इष्टे देशे इष्टसर्वोपकरणम अश्नीयात्-आहार सेवन करताना ते स्थान स्वच्छ आणि मन प्रसन्न करणारे असावे.

७) न अति द्रुतम अश्नीयात्-अतिघाईने/जलदगतिने आहार घेऊ नये. त्यामुळे प्रसन्नमनाने भोजनाचा आस्वाद घेतला जात नाही.

८) न अतिविलम्बितम अश्नीयात्-अतिसावकाश खाऊ नये. टिव्ही पहात जेऊ नये.

९) अजल्पनं अहसन् भुञ्जीतन-हसता, न बडबड करता जेवावे

१०) आत्मानं अभिसमीक्ष्य भुञ्जीत- जी वस्तू / घटक मला तत्काल सेवनाने आणि सतत सेवनाने भविष्यात/ उत्तरकाळातही अनुपकारक ठरत नाही त्याचेच सेवन व्हावे. असे विधिवत नियम पाळुन केलेला आहार दीर्घायुष्य आणि आरोग्य देतो.

अन्नमयं मनः ।

म्हणजेच मनाचे स्वास्थदेखील अन्नावरच ठरत असते.

मानवी मानसिक स्वाथ्यावर विपरित परिणाम करणारे घटक-

१) अपेक्षांचे ओझे, वाढत्या गरजा आणि आर्थिक अडचणी.

२) कौटुंबिक कारणे यात सुसंवादाचा अभाव असतो.

३) आर्थिक नियोजनातील अडचणी.

४) वाढणारे वय आणि त्याबरोबर वाढणाया जाबदाऱ्या विशेषतः तरुण / युवकांमध्ये मानसिक स्वास्थ्यावर परिणाम करतात.

५) तरुणांमध्ये बऱ्याचदा प्रेमभंग यामुळे निर्माण झालेली मानसिक अस्थिरता.

६) आवडीप्रमाणे वातावरण न मिळणे इच्छा व अपेक्षा यांची पूर्तता न होणे ह्याबाबी मानसिक स्वास्थ्य बिघडण्यास कारणीभूत ठरतात. याचा अनिष्ट परिणाम म्हणून मानसिक रोग, व्यसनाधीनता, आत्महत्येचे प्रकार उद्भवू शकतात. अपयश हे यशाच्या विरुद्ध नाही ते त्याचा पाया आहे. खेळात, शाळेत आणि जीवनात, आपण मुलांना जिंकण्यासाठी तयार करण्यात इतका वेळ घालवतो की आपण त्यांना सर्वात जास्त आकार देणारे क्षण विसरतो जिथे ते करत नाहीत.यश चांगले वाटते, परंतु ते खूप कमी शिकवते. संघर्ष, निराशा, दबाव आणि अपयश हे असे वर्ग आहेत जिथे चारित्र्य घडते.खरोखर महत्त्वाचे म्हणजे तरुणांना गोष्टी त्यांच्या मनाप्रमाणे न झाल्यास कसे प्रतिसाद द्यायचे हे शिकवणे गरजेचे आहे जसे

- निराशेतून कसे श्वास घ्यायचे.
- भावना तीव्र उंचावल्यावर शांत कसे राहायचे.
- प्रतिक्रिया देण्याऐवजी चिंतन कसे करायचे.
- सबबी देण्याऐवजी उपाय कसे शोधायचे.
- आत्मविश्वास कमी असतानाही धैर्याने कसे वागायचे.

जेव्हा आपण परिपक्वता, लवचिकता आणि आत्मविश्वासाने अपयशाला तोंड देण्यास शिकतो, तेव्हा आपण निराशेसाठी, दबावासाठी प्रतिकार करण्यासाठी तयार होतो.

मानसिक स्वास्थ्य राखण्यासाठी अथवा सुधारण्यासाठी उपाय-

१) प्रभावी संभाषण कौशल्य वापरणे.(Let's talk / मनमोकळे बोलले पाहिजे.)

२) आदर व सन्मानपूर्वक व्यवहार केला पाहिजे.

३) नेहमी मैत्रीपूर्ण रहाणे, टीका न करणे यांचे पालन करावे.

'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार'

या सद्गुरु वामनराव पै यांच्या उक्तीप्रमाणे मानसाने नेहमी सकारात्मक विचारांची सवय आपल्या मनाला लावून घ्यावी. अशी सवय लागली की मग संकटे आपल्यासाठी संधी ठरतात. सकारात्मक विचार करायला सुरुवात केली तर निदान नकारात्मक प्रसंगामुळे आपली होणारी चिडचिड आणि अनवस्थता तरी कमी होईल.

४) मानसिक स्वास्थ्य टिकविण्यासाठी-मानसिक स्वास्थ्य बिघडण्यासाठीच्या कारणांमध्ये तणाव, चिंता, आणि नैतिक दबाव या बाबी युवकांमध्ये असू शकतात. यासाठी, मानसिक स्वास्थ्यावर लक्ष देणे आवश्यक आहे. योग, ध्यान, आणि मेडिटेशन यांसारख्या साधनांनी मानसिक स्वास्थ्य टिकून राहते.त्यामध्ये मेडिटेशन खूप महत्त्वाचे आहे. त्यापैकी विपश्यना मधील तंत्र दैनंदिन 'आनापान अभ्यास' हा मानसिक स्वास्थ्य टिकविण्यासाठी आणि आनंदी उपयुक्त जीवन जगण्यासाठी एक सोपा व्यवहारिक मार्ग आहे.विपश्यना म्हणजे 'गोष्टी जशा आहेत तशा पाहणे' आत्मनिरीक्षणाद्वारे मानसिक शुद्धीकरणाची (श्वासावर लक्ष केंद्रित ठेवणे) तार्किक प्रक्रिया आहे.

५) शारीरिक, मानसिक स्वास्थ्यासाठी पुरेशी झोप अत्यंत महत्त्वाची आहे.किमान ६ ते ७ तास झोप उत्तम आरोग्यासाठी आवश्यक आहे. अवेळी झोप जसे रात्री उशिरा झोपणे, दिवसा बराच वेळ झोपणे आरोग्यास हानिकारक आहे. योग्य निद्रेवरच मानवी स्वास्थ्य, सुख, बल, पोषण, वृष्यता, ज्ञान, जीवित इ. बाबी अवलंबून असतात.

७) कोणत्याही अहितकर बाबींचा त्याग करावा, कोणतेही अनिष्ट व्यसन टाळावे (व्यसन अनेक रोगांना कारणीभूत ठरते. व्यसनाने अनेक शारीरिक, मानसिक, आर्थिक सामाजिक समस्या उद्भवतात. युवकांनी तंबाखू, मद्यपान आणि ड्रग्सपासून दूर राहावे. या सर्व गोष्टी शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत हानिकारक असतात. स्वास्थरक्षणाचे द्दष्टीने इतर शास्त्रोक्त आचरण नियम थोडक्यात पुढीलप्रमाणे-

दिनचर्या क्रम- ब्रह्ममुहुर्तावर उठणे (दैनंदिन सूर्योदयापूर्वी

किमान एक ते अर्धा तास अंगोदर उठणे उत्तम आरोग्यासाठी महत्वाचे आहे.) प्रातः आलेले मलमुत्रादिवेग उदीरण करणे. दात घासणे (तिखट, कडू, तुरट रसात्मक औषधी वनस्पति द्रव्य वापर करावा गोड/केमिकल युक्त पेस्ट टाळाव्यात), अर्धशक्ती नियमित व्यायाम (शरीरास विशिष्ट ताण देणे, कपाळावर घाम येईपर्यंत व्यायाम करणे.)

व्यायाम महत्त्व-दैनिक व्यायाम हे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी आवश्यक आहे. युवकांनी किमान ३० मिनिटे दैनंदिन व्यायाम करावा. यामुळे हृदयरोग, उच्च रक्तदाब, वजन नियंत्रण आणि हाडांच्या मजबुतीसाठी मदत होईल.तसेच, व्यायामामुळे मानसिक तणाव कमी होतो. अभ्यंग (अंगाला तेल लावणे/मसाज करणे) आवश्यक तेल शरीरात शोषले जाते. अंगाला सुगंधी उटणे लावणे (ीर्लीलळपस). सुखोष्ण पाण्याने स्नान करणे. पूजनीय आदर्शाचे पुजन/स्मरण करणे (मन स्वास्थ्यासाठी) मंगलाचरण. दिवसभरात किमान दोनवेळा आहार सेवन विधिवत करावा (सकाळचे जेवण १० ते २ वाजे पर्यंत, सायंकाळचे जेवण ७ ते ८ वाजे दरम्यान करावे.) रात्री दही तथा आंबट पदार्थांचे सेवन करू नये, आयुर्वेद शास्त्रानुसार ते निशिद्ध आहे. दिवसा दही खावयाचे झाल्यास आवळा, साखर अथवा मूग इ. सोबतच सेवन करावे. शरीरात जे पदार्थ अनावश्यक आहेत, ते शरीरात न ठेवता बाहेर टाकण्याची शरीराची नैसर्गिक प्रवृत्ती त्याला 'वेग 'असे आयुर्वेदाने संबोधले आहे. मलमूत्र या गोष्टी वेळीच शरीराबाहेर पडणे आवश्यक असते तसे न झाल्यास विविध रोगांची निर्मिती होते वात, मल, मूत्र, शिंका, तहान, भूक, झोप खोकला,श्रमाने येणारा दम, जांभई, अश्रू, ओकारी, शुक्र या गोष्टींची बाहेर जाण्याची प्रवृत्ती झाल्यास त्यांना कोणत्याही कारणाने अडवू नये तहान व भूक हे दोन घटक शरीराबाहेर पडणारे नसले तरी शरीराच्या त्या स्वाभाविक प्रवृत्ती असल्यानेत्यांचा यात समावेश केला आहे.असे धारण न करण्याचे १३ वेग सांगितले आहेत अन्यथा त्याना रोखल्याने त्यायोगे अनेक वातप्रकोपकजन्य रोग उद्भवू शकतात.

पाणी पिण्याबाबत नियम-

सकाळी झोपेतून उठल्यावर खूप जास्त पाणी पिण्याची आवश्यकता नाही. तहान असतानाच पाणी प्यावे, तेही मोजकेच गरजेपुरते प्यावे. तहान असतानादेखील अधिक प्रमाणात पाणी पिल्याने जाठराग्निवर/पाचन प्रक्रियेप्रक्रियेवर दुष्परिणाम होतो. पाण्याचा मात्रेतच आणि विधियुक्त वापर प्राणधारक आहे, म्हणून त्याला जीवन म्हणतात. फ्रीजमधील थंडपाणी कधीही पिऊ नये. शास्त्रानुसार कोमट पाणी नियमित पिण्यासाठी अत्यंत हितकारक आहे.

'अपचनावरी औषध उन पाणी, पचन झाल्यावरी पिणे बलप्रद । जेवताना पाणी होई अमृतासमान, जेवणानंतर लगेच विष ठरे ॥ झोपताना पिणे वाईट हो फार, त्याने होईल सर्दी रोग मस्तकाचे ।'

-नियमित व्यायाम, सदविचार, प्रसन्न राहण्या-वागण्याने, सूर्यप्रकाश इ. ने शरीरात Happy Hormones जसे की Serotonin, Dopamine, Endorphin, Oxytocin चांगल्या प्रमाणात स्त्रवतात. त्यांचे स्त्रवण शरीर-मानस आरोग्यासाठी खुप महत्वाचे आहे.

म्हणून स्वास्थ्य टिकविण्याच्या इच्छेने मनुष्याने सारा-सार/योग्य-अयोग्याचा विवेकबुद्धीने वापर करुन सार/योग्य ते स्विकारावे. म्हणजेच कोणत्याही बाबतीत हीनयोग, अतियोग (चुकीचे वर्तन) होणार नाही याची काळजी घ्यावी.

त्यामुळे आपणच आपल्या काही ज्ञात-अज्ञात चुका अुवा समजांमुळे आरोग्य व्याख्या बदलायची का? जसे की आयुष्य भर गोळ्या खाऊन जगायचे आणि सर्व रिपोर्ट नॉर्मल ठेवायचे म्हणजे आरोग्य का ?? म्हणूनच आपल्या सदविवेकाने "Health is a state of complete Physical, mental, Social & spiritual well being & not merely the absence of disease. अशी स्थिती आपल्या स्वास्थ्यासाठी आपणच स्वतः जपायची आहे.

**डॉ नितीन मारुती खामकर**
वैद्यकिय अधिकारी गट अ
पोलिस प्रशिक्षण केंद्र नानवीज, दौंड.
